# अध्याय -२

## अस्थापनेची कामे व त्यांना नेमून दिलेली कार्य.

श्री हरिलाल भगवती महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय हे बोरीवली (प) हे महानगरपालिकेचे मुंबईच्या उत्तर ठोकाकडचे पश्चिम उपनगरातील महत्वाचे उपनगरीय रुग्णालय आहे.ते आर उत्तर विभागाच्या आखत्यारित येत असून फिल्मसिटी ,गोरगांव पासून ते ठाणे शहराच्या पालघर डाहाणूरोड आणि गुजरात राज्याच्या आजुबाजुच्या परिसरातून रुग्णांना सेवा पुरविण्यात येतात.पश्चिम द्रुतगतीमार्ग रेल्वे,समुद्रकिनारा आणि झोपडपटटीतील वाढत्या लोकसंखेमधील रुग्णांसाठी सदर रुग्णालय स्टेटेजिक हेथ केअर डिलीव्हरी सेंटर म्हणून काम पाहते.

सदर रुग्णालयाचे उदघाटन त्यावेळचे भारताचे उप प्रतप्रधान श्रीयुत मोरारजी देसाई यांनी ४.२.१९६८ रोजी केले. त्यावेळेस रुग्णालयाची क्षमता ५०रुग्ण शय्यांची होती.सध्या या रुग्णालयाची क्षमता ३७३ रुग्णशय्येंची झाली असून ते २०००० स्के.मि. क्षेत्रात विभागले गेले आहे.

श्री. हरीलाल भगवती महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय, बोरीवली (प) येथील रूग्णालयाची इमारत धोकादायक ठरल्यामुळे सर्व कक्ष व कर्मचा-यांसह भगवती रुग्णालयाचे स्थानांतरण कांदिवली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रूग्णालय येथे झाले आहे. डॉ. श्री कृष्णकुमार पिंपळे हे श्री हरिलाल भगवती महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय हे हया दुय्यम रुग्णालयाचे प्रमुख असून बा.य.ल नायर रुग्णलाय यांच्याशी सलग्न आहे.

स्थानिक जनतेला वैदयकीय सुविधा तातडीने उपलब्ध व्हाव्यात या हेतूने भगवती रुग्णालयाच्या पुर्नविकासाच्या पहिल्या टप्प्यात रुग्णशय्येच्या वैद्यकीय विभागाची इमारत 110 बांधून तयार असून दि. 15.04.2016 रोजी बाहयरुग्ण विभाग व त्याला संलग्न इतर विभाग सुरु करण्यात आले आहेत. तसेच दि 27.06.2016 रोजी आंतररूग्ण विभागाचे 2 कक्ष सुरू करण्यात आले.

नव्याने सुरु झालेल्या रुग्णशय्येच्या भगवती रुग्णालयात खालील सोयीसुविधा उपलब्ध करून 110 .देण्यात आलेल्या आहेत

1. 24x वैद्यकीय सेवा 7
2. बाहय रुग्ण व आंतररुग्ण वैद्यकीय कक्ष
3. प्रयोगशाळा व विकृती शास्त्र विभाग
4. क्ष किरण व सोनोग्राफी विभाग
5. रुग्णवाहीनी व शववाहीनी सेवा
6. परिचारीका प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह